दै. रिपब्लिकन गार्ड दि. 03/01/2023.

# नांदेड येथे रस्ता सुरक्षा अभियानाचा शुभारंभ





नांदेड,(जिमाका)-रस्ते अपघातात होणारी वाढ व यात होणारी जीवीतहानी दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. परिवहन विभागाने जे नियम दिले आहेत त्या नियमानुसार वाहनांची निगा व गतीबाबत दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन केले तर प्रत्येकाच्या जागरुकतेतून अपघातांची ही संख्या आपल्याला कमी करता येऊ शकेल. कायद्याच्या पालनासह वाहन चालवितांना योग्य ती दक्षता घेतली तर यात होणारे मृत्यूचे प्रमाण आपल्याला कमी करता येऊ शकेल, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव दलजीत कौर-जज यांनी केले.

रस्ता सुरक्षा अभियानाच्या आज आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या. हेलमेंट परिधान केलेल्या दुचाकीस्वार व सीटबेल्ट परिधान केलेल्या चारचाकी चालक व इतर प्रवाशी यांना गुलाब पुष्प देऊन त्यांच्या हस्ते आज प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी यावेळी पोलीस विभागातर्फे रस्ता सुरक्षा अभियानाबाबत जनतेला आवाहन करून वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याबाबत सांगितले. अशा उपक्रमातून लोकांनी लोकांचे प्रबोधन केल्यास सुरक्षिततेची भावना व काळजी मोठ्या प्रमाणात वाढीस लागेल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे पान ४ वर

सत्यप्रभा दि. 03/01/2023.

# पोलिसाचा प्रामाणिकपणा

## सापडलेला मोबाईल व पैसे केले परत

मुदखेड, दि. १ (ता.प्र.) : चिकाळा येथील शेतकरी अशोक दत्ता सूर्यवंशी मुदखेड येथे आठवडी बाजार करण्यासाठी येत असताना ईजळी शिवारात रस्त्यावर मोबाईल व पैसे खिशातून पडले ते पैसे व मोबाईल मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रामदास आवळे यांना पेट्रोलिंगच्या वेळी सापडले. त्यांनी तो मोबाईल व पैसे संबंधित शेतकऱ्याचा शोध घेऊन परत केले.

नववर्षाचा बंदोबस्त असल्याने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस निरीक्षक महेश शर्मा, जमादार रघुवंशी, अमलदार रामदास आवळे मुदखेड ते ईजळी रोडने जात असताना डांबरी रस्त्यावर एक रियल मी कंपनीचा मोबाईल व मोटार सायकलीचे लायसन्स तसेच रोख रक्कम पाचशे रुपये त्यांना सापडले. या



बाबत चौकशी केली असता सदरचा मोबाईल व पैसे अशोक दत्ता सूर्यवंशी रा. चिकाळा यांचे असल्याचे समजले. या बाबत अशोक सूर्यवंशी यांना बोलावून घेवून खात्री केली व त्यांचा ऐवज परत केला.